MHST010011662021

दाखल तारीख – १४.०६.२०२१
नोंदणी तारीख – २४.०६.२०२१
निकाल तारीख – ०३.०८.२०२६
कालावधी – वर्ष – महिने – दिवस
०५ – ०१ – १३

मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, सातारा
(अध्यक्ष अरविंद शं. वाघमारे)
मोटार अपघात नुकसान भरपाई मागणी अर्ज क्र. १०४/२०२१

निशाणी क्र. ५२

१. **श्री. सुरेश आनंदराव सोनावणे,**
वय वर्षे– ५६, धंदा– शेती.
२. **श्री. नितीन सुरेश सोनावणे,**
वय वर्षे– ३०, धंदा– काही नाही.
३. **स्नेहा सुरेश सोनावणे,**
वय वर्षे– २७, धंदा– काही नाही.
सर्व रा. मोळाचा ओढा, सैदापूर फाटा, ता.जि.सातारा.

... **अर्जदार**

विरुध्द

१. **श्री. रोहन प्रभाकर कुंभार,**
वय वर्षे– २४, धंदा– वाहन चालक.
रा. बावधन, ता. वाई, जि. सातारा.
२. **श्री. धनंजय तानाजी शिंदे,**
वय वर्षे– सज्ञान, धंदा– डंपर मालक.
रा. मु.पो. सोनगाव, ता. जावली, जि.सातारा.
३. **रॉयल सुंदरम जनरल इन्शुरन्स कं.लि.,**
ऑफिस क्र.६, पी–८/१, हॉटेल प्रिती एक्झीकेटीव्ह ॲण्ड कमर्शिअल कॉम्प्लेक्स, २रा मजला, जुनी एम.आय.डी.सी, सातारा.

... **सामनेवाले**

अर्जदारांतर्फे वकील– श्री. एस.एन. भोईटे.
सामनेवाला क्र.१ व २ तर्फे वकील – श्री.एम.वाय. शिंदे.
सामनेवाला क्र.३ तर्फे वकील– श्री. एस.ए. जोशी.

न्यायनिर्णय

(जाहीर दिनांक ०३ ऑगस्ट २०२६)

अर्जदार क्र.१ यांची पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ यांची आई अलका सुरेश सोनावणे, वय ४७ वर्षे यांचा वाहन अपघातात मृत्यू झाल्यामुळे नुकसान भरपाई रक्कम रुपये ५०,४२,०००/– मिळण्याकरीता अर्जदारांनी प्रस्तुत प्रकरण मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १६६ अन्वये दाखल केले आहे.

०२. अर्जदारांचे कथन थोडक्यात असे आहे की, दिनांक २२.०१.२०२१ रोजी दुपारी ०३.४५ च्या सुमारास मयत अलका या अर्जदार क्र.१ यांचेसोबत स्कुटी क्र. एम.एच.०२बी.यु.४४२४ (येथून पुढे सोईसाठी या वाहनाचा उल्लेख ''सदर स्कुटी'' असा करण्यात येईल.) वर मागे बसून प्रवास करत होत्या. ओझर्डे–वाई रस्त्यावरील भद्रेश्वर पुलाजवळ मौजे वाई गावच्या हद्दीत सामनेवाला क्र.१ यांनी सामनेवाला क्र.२ यांच्या मालकीचा डंपर क्र. एम.एच.११सी.एच.३६९३ (येथून पुढे सोईसाठी या वाहनाचा उल्लेख ''सदर डंपर'' असा करण्यात येईल.) भरधाव वेगात, हयगयीने, निष्काळजीपणे चालवून मयत अलका प्रवास करत असलेल्या सदर स्कुटीला पाठिमागून जोरात धडक देवून अपघात केला. सदर अपघातात झालेल्या गंभीर जखमांमुळे मयत अलका या जागीच मयत झाल्या. अशाप्रकारे अपघात हा सदर डंपर चालकाने निष्काळजीपणे वाहन चालविल्यामुळे झालेला आहे.

०३. मयत अलका यांचे वय अपघातावेळी ४७ वर्षे होते. त्या घरकाम करत होत्या. पत्नी मयत झाल्याने अर्जदार यांना घरकामाचे दरमहा रुपये ५०००/– द्यावे लागत आहेत. तसेच मयत अलका या मुंबई येथे नितीन ऑप्टीकल्स या नावाने चष्मा फ्रेम तयार करण्याचा व्यवसाय करत होत्या

त्यापासून त्यांना सर्व खर्च वजा जाता दरमहा रुपये ३०,०००/– इतके उत्पन्न मिळत होते. मयत अलका यांच्या आकस्मीक निधनामुळे अर्जदारांनी सामनेवाला क्र.१ ते ३ यांचेकडून विविध विभागांखाली संयुक्तिक आणि अलगपणे रुपये ५०,४२,०००/– नुकसान भरपाई मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०४. सामनेवाला क्र.१ व २ यांचेवर नोटीसची बजावणी झाल्यावर त्यांनी प्रस्तुतकामी हजर होऊनही कैफियत दाखल न केल्याने त्यांच्याविरुद्ध अर्ज विना कैफियत चालणेबाबतचा आदेश पारीत करणेत आला.

०५. सामनेवाला क्र.३ यांनी लेखी कैफियत निशाणी १८ लगत दाखल करुन अर्जदारांची कथने नाकारली आहेत. त्यांनी मयताचे वय, व्यवसाय व उत्पन्न नाकारले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, डंपर चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना नव्हता. त्यामुळे विमा पॉलीसीमधील अटी व शर्तींचा भंग झाला आहे. अपघात हा सदर स्कुटी चालकाच्या चुकीमुळे झाला आहे. सदर डंपर चालकाचा अपघातात निष्काळजीपणा नाही. अर्जदारांनी विकास संजय अनपट यांना प्रस्तुतकामी पक्षकार म्हणून सामिल केले नसल्याने अर्जास आवश्यक पक्षकार सामिल नाहीत या तत्वाची बाधा येते. या आणि इतर मुद्यांवर अर्जदारांचा दावा फेटाळण्यात यावा अशी सामनेवाला क्र.३ यांनी विनंती केली आहे.

०६. माझे पूर्वाधिकारी यांनी अर्जदार व सामनेवाला यांच्या कथना आधारे निशाणी १९ प्रमाणे वादप्रश्न निश्चित केले आहेत. त्या वादप्रश्नांवर त्यालगत माझे निष्कर्ष आणि त्यांची कारणमीमांसा खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

अ.क्र.	वादप्रश्न	निष्कर्ष
१.	दिनांक २२.०१.२०२१ रोजी स्कूटी क्र.एम.एच.०२बी.यु.४४२४ आणि डंपर क्र.एम.एच.११सी.एच.३६९३ च्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वेगाने डंपर चालविल्याने अपघात झाल्याचे अर्जदार सिद्ध करतात काय ?	होय.
२.	प्रस्तुतचा अपघात दोन्ही वाहनांच्या सहयोगी निष्काळजीपणामुळे घडला आहे काय ? असल्यास प्रत्येकाचा निष्काळजीपणा किती ?	नाही.
३.	प्रस्तुतचा अपघात केवळ सुरेश सोनावणे याने बेदरकार व निष्काळजीपणे स्कूटी चालविल्यामुळे घडला आहे काय ?	नाही.
४.	प्रस्तुत अपघातात झालेल्या जखमांमुळे मयत अलका यांचा मृत्यू झाला आहे काय ?	होय.
५.	अर्जास आवश्यक पक्षकार सामिल नाहीत या तत्वाची बाधा येते काय ?	नाही.
६.	सामनेवाला क्र.२ याने विमा पत्रातील अटी व शर्तीचा भंग केल्याने सामनेवाला क्र.३ हे नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नसल्याचे सिद्ध होते काय ?	होय.
७.	अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत काय? असल्यास किती व कोणाकडून?	होय. अंतिम आदेशाप्रमाणे.
८.	निवाडा काय?	अंतिम आदेशाप्रमाणे.

कारणमीमांसा

०७. अर्जात केलेली विधाने सिध्द करणेसाठी अर्जदारांतर्फे खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर करणेत आला आहे.

१	प्रथम वर्दि अहवाल.	नि. २४
२	खबरी जबाब.	नि. २५
३	घटनास्थळ पंचनामा.	नि. २६
४	शवाचा पंचनामा.	नि. २७
५	शव विच्छेदन अहवाल.	नि. २८
६	डंपरची विमा पॉलीसी.	नि. २९
७	डंपरचे नोंदणीपुस्तक.	नि. ३०
८	मयत अलका यांचा शाळा सोडल्याचा दाखला.	नि. ३३
९	अर्जदार क्र.१ यांचा वाहन चालविण्याचा परवाना.	नि. ३४
१०	व्यवसायाच्या जागेचा भाडेकरार.	नि. ४९
११	नितीन ऑप्टीकल्सचे मंथली स्टेटमेंट.	नि. ५०
१२	नितीन ऑप्टीकल्सची फायर पॉलीसी.	नि. ५१

०८. सामनेवाला क्र.३ यांचेतर्फे खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर करणेत आला आहे.

१	डंपरच्या विमा पॉलीसीची प्रत.	नि. ४४
२	रे.फौ.ख.क्र.६४/२०२१ मधील दोषारोप पत्र.	नि. ४५

०९. अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र.१ सुरेश आनंदराव सोनावणे यांनी निशाणी २३ प्रमाणे पुराव्याचे शपथपत्र सादर केले. अर्जदारांच्या कथनांचे खंडण करणेसाठी सामनेवाला क्र.३ यांनी त्यांचेतर्फे साक्षीदार क्र.१ भारत शामराम केदरे, विमा कंपनीचे कर्मचारी यांचा पुरावा निशाणी ४१ अन्वये नोंदविला आहे.

१०. अर्जदारांचे वकील श्री.एस.एन. भोईटे, सामनेवाला क्र.३ यांचे वकील श्री.एस.ए. जोशी यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अर्जदारांच्या वकीलांनी

निशाणी ४८ अन्वये दाखल केलेल्या लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले.

११. अर्जदारांच्या विधीज्ञांनी युक्तीवादादरम्यान सादर केलेल्या खालील न्यायनिर्णयांचे अवलोकन केले.

1) 2014 ACJ 2648 S.C.

2) 2023(2) TAC 355 S.C.

3) 1996 ACJ 613 Guj.

4) 1985 ACJ 182/192 Bom.

5) AIR 1990 Mad. Page 305.

6) 2003(2) TAC 435 Cal.

7) 2016–22–Digest 1604 S.C.

8) 2025(1) TAC 1 S.C.

9) 2023(2) TAC 353 S.C.

10) Special leave petiotion Civil 33915/2025.

11) 2017 ACJ 2007 S.C.

12) 2020(3) TAC 711 S.C.

13) 2005 ACJ 374 Bom.

14) 2025(1) TAC 25 S.C.

मुद्दा क्रमांक १ ते ८ –

१२. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने एकत्रीतपणे चर्चेला घेतले आहेत.

१३. अर्जदार क्र.१ यांनी पुराव्याच्या शपथपत्रामध्ये सांगितले की, दिनांक २२.०१.२०२१ रोजी दुपारी ०३.४५ च्या सुमारास मयत अलका या

त्यांच्यासोबत सदर स्कूटीवर मागे बसून प्रवास करत होत्या. ओझर्डे–वाई रस्त्यावरील भद्रेश्वर पुलाजवळ मौजे वाई गावच्या हद्दीत सामनेवाला क्र.१ यांनी सामनेवाला क्र.२ यांच्या मालकीचा सदर डंपर भरधाव वेगात, हयगयीने, निष्काळजीपणे चालवून मयत अलका प्रवास करत असलेल्या सदर स्कुटीला पाठिमागून जोरात धडक देवून अपघात केला. सदर अपघातात झालेल्या गंभीर जखमांमुळे मयत अलका या जागीच मयत झाल्या.

१४. पोलीस तपासाची कागदपत्रे प्रथम वर्दि अहवाल निशाणी २४ वरुन असे दिसते की, घटनेची खबर श्री. सुरेश आनंदराव सोनावणे यांनी दिली होती. त्यांनी वरीलप्रमाणे घटना घडल्याचे कथन केले आहे. घटनास्थळाचा पंचनामा निशाणी २६, मरणोत्तर पंचनामा निशाणी २७, शव विच्छेदन अहवाल निशाणी २८ इत्यादिवरुन हे स्पष्ट होते की, सदर डंपर चालकाच्या चुकीमुळे अपघात होऊन अपघातातील दुखापतींमुळे मयत अलका यांचा मृत्यू झाला. तपासाअंती सदर अपघाताचा गुन्हाही डंपर चालकाविरुद्ध नोंदविण्यात आला आहे. सबब, अपघात दोन्ही वाहन चालकांच्या सहयोगी निष्काळजीपणामुळे अथवा सदर स्कूटी चालकाच्या निष्काळजीपणामुळे झाला ही बाब सिद्ध होत नाही.

१५. विमा कंपनीचे कथन असे आहे की, सदर डंपर चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना नसताना त्याने वाहन चालवले आहे. त्यामुळे विमा पॉलीसीमधील अटी व शर्तींचा भंग झाला आहे. ही बाब शाबीत करण्यासाठी सामनेवाला क्र.३ यांनी त्यांचेतर्फे साक्षीदार क्र.१ भरत शामराव केदारे यांचा पुरावा निशाणी ४१ अन्वये नोंदविला आहे. त्यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, त्यांच्या विमा कंपनीकडे सदर डंपरचा विमा दि.२६.०२.२०२० ते २५.०२.२०२१ या कालावधीसाठी निशाणी ४४ कडील विमा पत्रात नमुद अटी व शर्तींच्या अधिन राहून उतरविला होता. अपघात दि.२२.०१.२०२१ रोजी

दुपारी ०३.४५ च्या सुमारास झाला. अपघातावेळी सदर डंपर सामनेवाला क्र.१ रोहन प्रभाकर कुंभार चालवित होता. त्यावेळी त्याच्याकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना नव्हता. त्यामुळे वाई पोलीसांनी सदर डंपर चालकाविरुद्ध भा.दं.सं.कलम ३०४(२), २७९, २२७, ३३८, ४२७ आणि मोटर वाहन कायदा १९८८ चे कलम ३ अन्वये गुन्हा दाखल केला. अशाप्रकारे अपघातावेळी सदर डंपर चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना नसल्याने सामनेवाला क्र. २ यांनी विमापत्रातील अटी व शर्तींचा भंग केला आहे.

१६. सामनेवाला क्र.१ याच्याकडे अपघातावेळी वाहन चालविण्याचा वैध परवाना होता अथवा नाही ही बाब सामनेवाला क्र.१ याच्या वैयक्तीक माहितीतील आहे. सामनेवाला क्र.१ प्रस्तुतकामी हजर झाले परंतु त्यांनी अर्जास कैफियत दाखल केली नाही, वाहन चालविण्याचा परवाना सादर केला नाही तसेच अर्जदाराच्या व सामनेवाला क्र.३ यांच्या साक्षीदारांचा उलटतपासही घेतला नाही. अशाप्रकारे सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदारांच्या कथनांचा कोणत्याही प्रकारे विरोध केला नाही. या बाबी विचारात घेता अपघातावेळी सदर डंपर चालकाकडे म्हणजेच सामनेवाला क्र.१ याच्याकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सामनेवाला क्र.२ याने विमापत्रातील अटी व शर्तींचा भंग केल्याचे दिसून येते.

१७. सामनेवाला क्र.३ यांनी निशाणी १८ अन्वये दाखल केलेल्या कैफियतीमध्ये श्री. विकास संजय अनपट यांना सदर डंपरचे मालक म्हणून प्रस्तुतकामी पक्षकार म्हणून सामिल केले नसल्याचे कथन केले आहे. निशाणी क्र.२५ कडील खबरीजबाबात श्री.विकास संजय अनपट यांचे नाव सदर डंपरचे मालक म्हणून नमुद असल्याचे दिसून येते. तथापी, निशाणी ३० कडील सदर डंपरच्या नोंदणी पुस्तकात तसेच निशाणी ४४ कडील विमा पत्रातही सदर डंपरचे

---9

मालक म्हणून सामनेवाला क्र.२ श्री.धनंजय तानाजी शिंदे यांचेच नाव नमुद असल्याचे दिसते. अर्जदारांनी त्यांना प्रस्तुतकामी पक्षकार केले असल्याने अर्जास आवश्यक पक्षकार सामिल नाहीत या तत्वाची बाधा येत नाही.

१८. अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे मयत अलका यांचे वय अपघातावेळी ४७ वर्षे होते, हे दाखविण्यासाठी त्यांनी निशाणी ३३ अन्वये मयत अलका यांचा शाळा सोडल्याचा दाखला दाखल केला आहे. त्यामध्ये त्यांची जन्मतारीख ११.०५.१९६५ अशी नमुद आहे. त्याप्रमाणे अपघातावेळी त्यांचे वय ५५ वर्षे ८ महिने पूर्ण इतके आहे. सबब, मयत अलका यांचे वय ५५ वर्षे लक्षात घेण्यात येत आहे. माननीय सर्वोच्च न्यायालयाचे ***सरला वर्मा वि।। दिल्ली ट्रान्स्पोर्ट कं. व इतर, २००९(२) टीएसी ६७७*** या न्यायनिर्णयातील निरिक्षणानुसार वयोगट ५१ ते ५५ साठी "११'' हा गुणांक या प्रकरणामध्ये लागू होतो.

१९. अर्जदारांच्या कथनानुसार मयत अलका या घरकाम करत होत्या, त्यांचा मृत्यू झाल्याने अर्जदार यांना घरकामाचे दरमहा रुपये ५०००/– द्यावे लागत आहेत. तसेच मयत अलका या मुंबई येथे नितीन ऑप्टीकल्स या नावाने चष्मा फ्रेम तयार करण्याचा व्यवसाय करत होत्या त्यापासून त्यांना सर्व खर्च वजा जाता दरमहा रुपये ३०,०००/– इतके उत्पन्न मिळत होते. याबाबत अर्जदारांनी निशाणी ४९ अन्वये व्यवसायाच्या जागेचा भाडेकरार, निशाणी ५० अन्वये नितीन ऑप्टीकल्सचे मंथली स्टेटमेंट आणि निशाणी ५१ अन्वये नितीन ऑप्टीकल्सची फायर पॉलीसी इत्यादि कागदपत्रे दाखल करुन मयत अलका या चष्मा फ्रेम करण्याचा व्यवसाय करत होत्या व त्यांना दरमहा रुपये ३०,०००/– इतके उत्पन्न मिळत होते असे कथन केले आहे. निशाणी ४९ कडील कराराचा दस्त हा दि. ०७.०२.१९९८ रोजीचा असून त्यात नमुद प्रमाणे कराराची मुदत ०६.०२.२००३ रोजी संपली आहे. अर्जदारातर्फे दाखल करणेत आलेला निशाणी

५० कडील खरेदी–विक्रीचा तपशिल हा सन १९९८–१९९९ सालचा आहे. तसेच निशाणी ५१ कडील फायर पॉलीसी सन २००० ची आहे. येथे हे नमुद करणे आवश्यक वाटते की, प्रस्तुतचा अपघात हा दि. २२.०१.२०२१ रोजी झाला आहे. परंतु अर्जदार यांनी सन १९९८ ते २००० सालचे दस्त दाखल केले असून अपघात तारीख अथवा साला नजीकचा कोणताही दस्त दाखल केला नाही. अशा परिस्थितीत अर्जदार सदरप्रमाणे व्यवसाय करत असतील तर अपघातावेळी तसा व्यवसाय करत असलेबाबतचा अपघात तारखेच्या नजिकचा पुरावा दाखल करणे अपेक्षीत होते. अर्जदार यांना सदर व्यवसायापासून रुपये ३०,०००/– इतके उत्पन्न मिळत असल्याबाबत त्यांच्या कथनांशिवाय अन्य पुरावा अभिलेखावर दाखल नाही.

२०. अर्जदाराच्या विधीज्ञांनी युक्तीवादादरम्यान असेही कथन केले की, ***शिशु पाल उर्फ शिष राम व इतर वि।। सुरजीत व इतर, स्पेशल लिव पिटीशन(सिव्हील) ३३९१५/२०२५*** या न्यायनिर्णयातील मार्गदर्शक तत्वांनुसार अर्जदार यांचे गृहिणी म्हणून दरमहा रुपये ३०,०००/– इतके उत्पन्न विचारात घेणेत यावे. नामदार सर्वोच्च न्यायालयाच्या निकषांचा आदर करुन येथे नमुद करावेसे वाटते की, सदर न्यायनिर्णयातील तथ्ये आणि परिस्थिती आणि प्रस्तुत प्रकरणातील तथ्ये व परिस्थिती वेगळी आहे. त्यामुळे या न्यायनिर्णयातील निर्देश येथे लागू करणे न्यायोचित वाटत नाही. त्यामुळे वरीलप्रमाणे विवेचन विचारात घेता नुकसान भरपाईच्या गणणेसाठी मयत अलका यांचे काल्पनीक उत्पन्न दरमहा रुपये १५,०००/– इतके विचारात घेण्यात येते.

२१. मयत अलका या विवाहीत होत्या. अर्जदार क्र.१ ते ३ हे त्यांच्या उत्पन्नावर अवलंबून होते. अपघातसमयी त्यांचे वय ५५ वर्षे होते. त्यामुळे ***नॅशनल इंशुरंस कं.लि. विरुध्द प्रणय सेठी, २०१७ ए.सी.जे.२७००*** या माननीय सर्वोच्च

न्यायालयाच्या निकालपत्रातील निर्देशाप्रमाणे मयताचे भविष्यातील उत्पन्नाची वाढ १० टक्के विचारात घ्यावी लागेल. तसेच मयताचे वयानुसार ११ चा गुणांक लागू होईल. मयतावर अर्जदार क्र.१ ते ३ हे अवलंबून असल्याने वैयक्तीक खर्चाकरीता १/३ रक्कम वजा करावी लागेल. या विवेचनाच्या आधारे नुकसान भरपाईची गणना खालीलप्रमाणे केली आहे.

१.	मयताचे वार्षीक उत्पन्न १२ x १५०००/-	रुपये १,८०,०००/-
२.	भविष्यातील उत्पन्नाची वाढ १० टक्के. (रुपये १,८०,०००+ १८०००)	रुपये १,९८,०००/-
३.	मयतावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या ३ असल्यामुळे मयताचा वैयक्तीक खर्च १/३ वजा करता मिळणारे उत्पन्न, वजा करता अर्जदाराची अवलंबीत्वाची रक्कम.	रुपये १,९८,०००/- वजा रुपये ६६,०००/- (रु. १,३२,०००/-)
४.	मयताचे वयाचा विचार करता उत्पन्नाची हानी निश्चित करण्यासाठी गुणांक ११ ने गुणून उत्पन्नाची अवलंबित्वाची रक्कम. (रुपये १३२०००/-x ११)	रुपये १४,५२,०००/-
५.	लॉस ऑफ कंसोरटिअम (सहवासाचे नुकसान) (दि.३१.१०.२०१७ पासून रुपये ४०,०००/- वर दर ३ वर्षांनी १० टक्के वाढीसह येणारी र.रु. ४४,००० x ३.)	रुपये १,३२,०००/-
६.	लॉस ऑफ इस्टेट (संपत्तीचे नुकसान) व अंत्यविधी या करीता खर्च एकत्रीतपणे रुपये ३०,०००/-. (दि.३१.१०.२०१७ पासून रुपये ३०,०००/- वर दर ३ वर्षांनी १० टक्के वाढीसह येणारी र.रु. ३३,०००/-)	रुपये ३३,०००/-
	नुकसान भरपाईची अंतिम रक्कम.(अ.क्र.४ ते ६)	**रुपये १६,१७,०००/-**

२२. निशाणी ४४ कडील विमापत्रान्वये सदर डंपरचा विमा दि.२६.०२.२०२० ते २५.०२.२०२१ या कालावधीसाठी सामनेवाला क्र.२ याने

सामनेवाला क्र.३ या विमा कंपनीकडे उतरविल्याचे दिसून येते. तथापी, वर विवेचन केल्याप्रमाणे सदर डंपर चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना नसताना त्याने वाहन चालवले आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.२ याने विमापत्रातील अटी व शर्तींचा भंग केला ही बाब शाबीत झाली आहे. या मुद्यावर सामनेवाला क्र.३ च्या विधीज्ञांनी युक्तीवादावेळी कथन केले की, सदर डंपर चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना नसताना त्याने वाहन चालविले असल्याने विमापत्रातील अटी व शर्तींचा भंग झाला आहे. सबब, अर्जदारांना नुकसान भरपाई देण्याच्या निर्णयास न्यायाधिकरण आले तर अर्जदारांना अदा करावयाची नुकसान भरपाईची रक्कम विमा कंपनीने अदा करुन ती Pay & recover या तत्वावर वाहन मालकांकडून वसुल करणेच्या अटीवर मान्य करणेत यावी.

२३. मोटार वाहन अपघातातील नुकसान भरपाईच्या लोकहिताच्या परोपकारी तरतुदीचा विचार करता अर्जदारांना देय होणारी नुकसान भरपाई Pay & recover या तत्वावर मान्य करुन सामनेवाला क्र.३ विमा कंपनीने सामनेवाला क्र.२, सदर डंपर मालक याचेकडून Pay & recover तत्वाप्रमाणे वसुली करणे योग्य राहील. सबब, अर्जदारांना मयत अलका यांच्या अपघाती मृत्यूबाबत वरीलप्रमाणे विविध तपशिलांसाठी नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी सामनेवाला क्र.१ ते ३ यांची संयुक्त व व्यक्तीशः आहे. अर्जदार वरील रकमेवर अर्ज दाखल तारखेपासून द.सा.द.शे.८ टक्के दराने व्याज मिळण्यास पात्र आहेत. करीता मुद्दा क्रमांक १, ४, ६ व ७ चे उत्तर 'होय' आणि मुद्दा क्रमांक २, ३ व ५ चे उत्तर "नाही" असे नोंदवून खालील आदेश पारीत करीत आहे.

आ दे श

१. अर्जदारांचा मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज खर्चासह अंशतः मंजुर करणेत येतो.

२. सामनेवाला क्र.१ ते ३ यांनी संयुक्तिकरित्या व वैयक्तीकरित्या अर्जदार यांना मोटार वाहन कायदा कलम १४० अन्वये मिळालेल्या "ना दोष दायित्वाच्या" रकमेसह नुकसान भरपाई पोटी एकूण रुपये १६,१७,०००/- (रुपये सोळा लाख सतरा हजार फक्त) व त्यावर अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम वसुल होईपर्यंत द.सा.द.शे. ८ टक्के व्याज दराने द्यावेत. नुकसान भरपाईची रक्कम सामनेवाला क्र.३ या विमा कंपनीने Pay & recover या तत्वाप्रमाणे अर्जदारांना देऊन ती नंतर सामनेवाला क्र.२ यांचेकडून वसुल करावी.

३. सामनेवाला क्र. १ व २ यांनी अर्जदारांना देण्याकरीता वरील रक्कम वाहन अपघात दावा न्यायाधिकरण यांचे बँक खाते क्रमांक ४०८२७५२६३३३, IFSC कोड क्र. SBIN-0010713 मध्ये जमा करावी.

४. नुकसान भरपाईच्या व्याजासह येणाऱ्या एकूण रकमेपैकी अर्जदार क्र.१ यांना ६०% आणि अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी २० टक्के रक्कम देण्यात यावी.

५. अर्जदार क्र.१ यांचे हिश्श्यास येणाऱ्या रकमे पैकी ५० टक्के रक्कम त्यांच्या पसंतीच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत तीन वर्षांच्या मुदत ठेवीने ठेवणेत यावी. मात्र ठेवीवरील मासिक अथवा त्रैमासिक व्याज त्यांच्या इच्छेनुसार घेण्याची त्यांना मुभा राहील. अर्जदार क्र.१ यांच्या हिश्श्याची उर्वरीत रक्कम त्यांच्या बँक खात्यात ऑन लाईन पद्धतीने वर्ग करण्यात यावी.

६. अर्जदार क्र.२ व ३ यांच्या हिश्श्याची व्याजासह रक्कम त्यांच्या बँक खात्यात ऑन लाईन पद्धतीने वर्ग करण्यात यावी.

७. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी नुकसान भरपाईची रक्कम वर्ग करण्यासाठी त्यांचा बचत खाते क्रमांक, पॅन क्रमांक आणि आधार क्रमांक सादर

करावा.

८. मुदतीपूर्वी सदर रक्कम या न्यायाधिकरणाचे पूर्व परवानगीशिवाय परत करणेत येवू नये.

९. अर्जदार यांनी अदा केलेले न्यायीक शुल्क कमी असल्यास, कमी असलेले न्यायीक शुल्क अर्जदार यांनी १५ दिवसांत अदा केल्यानंतर आदेश अंमलात येईल. न्यायीक शुल्क देण्यास विलंब झाल्यास आदेशाच्या तारखेपासून न्यायीक शुल्काची रक्कम अदा करे पर्यंतच्या कालावधीत नुकसान भरपाईच्या रकमेवर व्याज मिळण्यास अर्जदार पात्र राहणार नाहीत.

१०. येणेप्रमाणे अंतिम हुकुमनामा करणेत यावा.

ARVIND WAGHMARE
Digitally signed by ARVIND WAGHMARE
Date: 2026.08.03 16:37:15 +0530

(अरविंद शं. वाघमारे)
दि. ०३ ऑगस्ट २०२६ अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
सातारा.